अ. वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखल झालेला पहिला हिंदी तसंच पहिला मराठी चित्रपट कोणता? त्यांचे निर्माते-दिग्दर्शक आणि कलाकार कोण?

— पहिला हिंदी चित्रपट प्रभातचा १९३६चा *अमरज्योती*. व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात हा चित्रपट दाखल झाला होता व तेथे जगातल्या तीन सर्वश्रेष्ठ चित्रपटांत या चित्रपटाची निवड झाली होती. व्ही. शांताराम या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. कलाकार दुर्गा खोटे, शांता आपटे, चंद्रमोहन, वासंती, बी. नांद्रेकर, के. नारायण काळे, वसंत देसाई. पहिला मराठी चित्रपट प्रभातचा *संत तुकाराम*. हा चित्रपटही १९३६चा होता आणि व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दाखल झाला होता. दामले-फत्तेलाल या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. कलाकार पागनीस, गौरी, बी. नांद्रेकर, भागवत, पंडित दामले, मा. छोटू, कुसूम भागवत, शांता मुजूमदार.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ *वीरांगना, गर्ल्स स्कूल, प्रीत का गीत, कभी धूप कभी छांव, नागमणी, चल चल रे नवजवान, गुनाहो का देवता* या चित्रपटांतील नायक-नायिका कोण? संगीतकार कोण?

— *वीरांगना* १९४७, नायक-नायिका प्रेम अदीब-शोभना समर्थ, संगीतकार एच. पी. दास. *गर्ल्स स्कूल* १९४९, नायक-नायिका सोहन-गीताबाली व सज्जन, शशीकला, संगीतकार अनिल विश्वास, सी. रामचंद्र. *प्रीत का गीत* १९५०, नायक-नायिका प्रेम अदीब-सुलोचना चटर्जी, संगीतकार श्यामबाबू पाठक. *कभी धूप कभी छांव* १९७१, नायक-नायिका, दारा सिंह-अमिता, संगीतकार चित्र गुप्त. *नागमणी* नावाचे दोन चित्रपट आले. १९५७ला पहिला, नायक-नायिका त्रिलोक कपूर-निरुपा रॉय, संगीतकार अविनाश व्यास. १९९१ला दुसरा, नायक-नायिका सुमित सायगल-शिखा स्वरूप, संगीतकार अन्नु मलिक. *चल चल रे नवजवान* १९४४, नायक-नायिका अशोककुमार-नस्सीम, संगीतकार गुलाम हैदर. *गुनाहो का देवता* नावाचे दोन चित्रपट आले. १९६७ला पहिला, नायक-नायिका जितेंद्र-राजश्री, संगीतकार शंकर-जयकिशन. १९९०ला दुसरा, नायक-नायिका मिथुन चक्रवर्ती, संगीता बिजलानी, संगीतकार अन्नु मलिक.


भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम, मुंबई.

□ *पडोसन, हरे कांच की चुडियां, गुमनाम, संन्यासी, दस नंबरी, शोर, क्रांती, त्रिशूल* या चित्रपटांतील प्रमुख कलाकार कोण? निर्माता-दिग्दर्शक, संगीतकार कोण? हे चित्रपट कधी प्रदर्शित झाले होते?

— *पडोसन* १९६८ला प्रदर्शित झाला होता. कलाकार सुनील दत्त, सायराबानू, मेहमूद, किशोरकुमार, ओमप्रकाश, आगा, मुकरी, सुंदर, गंगा, प्रवीण पॉल, केस्तो मुखर्जी, दुलारी, राजा किशोर, निर्माता मेहमूद, दिग्दर्शक ज्योती स्वरूप, संगीतकार आर. डी. बर्मन. *हरे कांच की चुडियां* १९६७ला आला होता. कलाकार विश्वजीत, नयना साहू, शिवकुमार, ललिता पवार, राजेंद्रनाथ, हेलन, नासीर हुसेन, सप्रू, मृदुला, सुमती गुप्ते-जोगळेकर, निर्माता-दिग्दर्शक किशोर साहू, संगीतकार शंकर-जयकिशन.
गुमनाम १९६५ला आला होता. कलाकार नंदा, मनोजकुमार, मेहमूद, प्राण, हेलन, मदनपुरी, धुमाळ, हीरालाल, तरुण बोस, निर्माता पृथ्वी पिक्चर्स, दिग्दर्शक राजा नवाथे, संगीतकार शंकर-जयकिशन.
संन्यासी या नावाचा चित्रपट आतापर्यंत दोनदा आलाय. १९४५ ला पहिला, १९७५ला दुसरा. १९४५च्या *संन्यासी*चे कलाकार शमीम, अमर, गुलाम मोहम्मद, नस्सीम(ज्यू), मिश्रा, शकीर, श्यामकुमार, निर्माता-दिग्दर्शक ए. आर. कारदार, संगीतकार नौशाद. १९७५च्या *संन्यासी*चे कलाकार मनोजकुमार, हेमामालिनी, प्रेमनाथ, प्रेम चोप्रा, अरुणा इराणी, प्रेमानारायण, नाझिमा, प्राण, इंद्राणी मुखर्जी, सुलोचना, कामिनी कौशल, राज मेहरा, शैलेशकुमार, चंद्रशेखर, जयश्री टी., अपर्णा चौधरी, निर्माता-दिग्दर्शक सोहनलाल कंवर, संगीतकार शंकर-जयकिशन.
दस नंबरी १९७६ला आला होता. कलाकार मनोजकमार, हेमामालिनी, प्रेमनाथ, बिंदू, प्राण, ओम शिवपुरी, कामिनी कौशल, डेव्हीड, सज्जन, अभी भट्टाचार्य, निर्माता-दिग्दर्शक मदनमोहला, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल.
शोर १९७२ला आला होता. कलाकार मनोजकुमार, जया भादुरी, प्रेमनाथ, कामिनी कौशल, मनोरमा, मनमोहन, कुलजीत, राज मेहरा, नाना पळशीकर, कृष्णधवन, मीना टी, शेफाली, पाहुणी कलाकार नंदा, निर्माता-दिग्दर्शक मनोजकुमार, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल.
क्रांती १९८१ला आला होता. कलाकार दिलीपकुमार, मनोजकुमार, हेमामालिनी, शशी कपूर, शत्रुघ्न सिन्हा, परवीन बाबी, शशीकला, निरूपा रॉय, सारिका, प्रेम चोप्रा, प्रदीपकुमार, मा. आदित्य, मा. कुणाल, निर्माता-दिग्दर्शक मनोजकुमार, संगीत लक्ष्मीकांत-प्यारेलाल.
त्रिशूल १९७८ला आला होता. कलाकार अमिताभ बच्चन, संजीवकुमार, शशी कपूर, हेमामालिनी, राखी, वहिदा, मुकेश खन्ना, प्रेम चोप्रा, पमेला चोप्रा, निर्माता गुलशनराय, दिग्दर्शक यश चोप्रा, संगीतकार खय्याम.

सोनाली फातर्पेकर, बांबोलीम, गोवा.

□ सोनाली बेंद्रेचा पहिला चित्रपट कोणता? त्यातील प्रमुख कलाकार कोण?



नाराज या पहिल्या चित्रपटात अतुल अग्निहोत्रीसोबत सोनाली बेंद्रे

— १९९४चा *नाराज* सोनाली बेंद्रेचा पहिला चित्रपट. या चित्रपटातील प्रमुख कलाकार मिथुन चक्रवर्ती, पूजा भट्ट, अतुल अग्निहोत्री, गुलशन ग्रोव्हर, सोनी रजदान, अवतार गिल.

रघुनाथ आप्पाराव पाटील, बेळगाव.

□ बिंदूने एखाद्या चित्रपटात बेदिंग सूट परिधान केलाय का?

— *नतीजा, जंजीर* यासारख्या अनेक चित्रपटांत बिंदूने बेदिंग सूट परिधान केलाय.

प्रतिभा बरबडे, यवतमाळ.

□ आशा पारेखचा नायिका म्हणून शेवटचा चित्रपट कोणता?

— १९७५चा *जखमी*.